दै. सत्यप्रभा दि. १६।०१।२०२५

# विद्यार्थ्याला अमानूष मारहाण





## तोंडात रुमाल कोंबला : तिघांविरोधात गुन्हा; मारकुटा पोलीस निलंबित

नांदेड, दि. १५ : दुचाकी चोरीच्या संशयावरून नीटची तयारी करणाऱ्या एका १८ वर्षीय विद्यार्थ्याला पोलीस कर्मचाऱ्याने पोलिसांदेखतच बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. शहरातील श्रीनगर परिसरातील एका वसतिगृहात पाच जानेवारीला ही घटना घडली होती. या मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. याप्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून संबंधित पोलीस कर्मचाऱ्याला निलंबित करण्यात आले आहे.

माहूर तालुक्यातील आसोली येथील प्रथमेश पुरी नांदेडमध्ये नीट परीक्षेची तयारी करत आहे. श्रीनगर भागातील एका हॉस्टेलमध्ये तो राहतो. पाच जानेवारीला सकाळी साडेअकराच्या सुमारास पोलीस कर्मचारी क्षीतिज कांबळे हा आकाश सावंत आणि श्रावण नामक मित्रासोबत वसतिगृहात आला होता. (पान दोनवर)

## विद्यार्थ्यांमध्ये दहशत

या घटनेने पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे. शिवाय बाहेरगावाहून शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. आरोपी पोलीस क्षीतिज कांबळे हा आरसीपीमध्ये कार्यरत होता. तपासाचे कुठलेही अधिकार नसताना त्याने हे कृत्य केले. काठीने मारहाण करणारा आकाश सावंत हा एका खासगी बँकेत कार्यरत आहे. पोलीस दलात कार्यरत असूनही तो ड्युटीवर गैरहजर राहत होता.